**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला प्रारंभ / भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार बहुतांश ठिकाणी आघाडीवर

- जम्मू-काश्मीरसह ६ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीलाही सुरुवात / नागरोटामधे भाजपाच्या देवयानी राणा तर **मिझोरम**मधे मिझो नॅशनल फ्रंटचे डॉ.एल लालथंगलियाना विजयी

- वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या राष्ट्रव्यापी अंमलबजावणी अभियानात उत्तरप्रदेश पहिल्या तर महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर

- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात ऑक्टोबर महिन्यात घट

**आणि**

- भारत- विरुद्ध दक्षिण आफ्रिका पहिला क्रिकेट कसोटी सामना कोलकात्यात सुरु/ नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिका फलंदाजीसाठी मैदानात

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी सुरुवात झाली. सुरुवातीला मिळालेले कल पाहता भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार बहुतांश जागांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांपेक्षा आघाडीवर आहेत. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - व्हॉईस कास्ट- - -**

*(भारतीय जनता पार्टी सर्वात जास्त* ***९०*** *जागी आघाडीवर आहे.*
*त्याखालोखाल जनता दल संयुक्त* ***८१*** *ठिकाणी आघाडीवर आहे.*
*चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष* ***२१*** *मतदारसंघात आघाडीवर आहे.*
*महाविकासआघाडीतला*
*राष्ट्रीय जनता दल पक्ष* ***२८*** *ठिकाणी आघाडीवर आहे.*
*भारतीय कम्युनिस्ट पार्टी लेनिनवादी चे उमेदवार* ***४*** *ठिकाणी तर*

*काँग्रेसचे उमेदवार **४** ठिकाणी आघाडीवर आहेत.*

*विद्यमान उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी,  तारापूर मतदारसंघात आघाडीवर आहेत तर राजद नेते तेजस्वी यादव राघोपूरमधे चुरशीची लढत देत आहेत.*

*बिहारमधे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला यश मिळत असल्याबद्दल मुंबईच्या भाजपा मुख्यालयात आनंदोत्सव सुरु आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाले आहेत.)*

**<><><><><>**

देशात इतर ६ राज्यातल्या प्रत्येकी एका मतदारसंघातल्या तसंच जम्मू आणि काश्मीरमधल्या २ मतदारसंघात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी देखील सुरु आहे.

**जम्मूकाश्मीर**मधल्या नागरोटा मतदारसंघात भाजपाच्या देवयानी राणा निवडून आल्या आहेत. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी जम्मू काश्मीर नॅशनल पँथर्स पार्टीचे हर्ष देव सिंग यांचा त्यांनी २४ हजार ६४७ मतांनी पराभव केला.

**बडगाम**मधे जम्मू काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीचे आगा सईद मुंतजिर मेहदी आघाडीवर आहेत.

**मिझोरम**मधे मिझो नॅशनल फ्रंटचे  डॉ.एल लालथंगलियाना निवडून आले आहेत. झोराम पीपल्स मूव्हमेंटचे  वनलाल सैलोवा यांना त्यांनी ५६२ मतांनी हरवलं.

**ओदिशा**तल्या नुआपाडामधे भाजपाचे जय धोलकिया आघाडीवर आहेत.

**तेलंगणा**त ज्युबिली हिल्स आणि राजस्थानात अंता इथं काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत.

**झारखंड**च्या घाटशिलामधे झारखंड मुक्ती मोर्चाचे सोमेशचंद्र सोरेन आघाडीवर आहेत.

**पंजाब**च्या तरणतारण मतदारसंघात आम आदमी पार्टीचे  हरमीत सिंग संधू आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते सुरतमधल्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या बांधकामाची पाहणी करतील. त्यानंतर ते नर्मदा

जिल्ह्यातल्या देवमोगरा मंदिरात दर्शन घेऊन पूजा करतील. देदीपाडा इथं धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री भाग घेतील. यावेळी ते ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील तसंच उपस्थितांना संबोधित करतील. याशिवाय ते विविध अभियानांतर्गत बांधण्यात आलेल्या सुमारे १ लाख घरांच्या प्रातिनिधिक गृहप्रवेश समारंभात भाग घेतील. आदिवासी भागाची संपर्क व्यवस्था सुधारण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या सुमारे साडे सातशे किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामाची पायभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन केलं आहे. जवाहरलाल नेहरू यांच्या १३६व्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीतल्या त्यांच्या शांतिवन समाधीस्थळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, आणि इतर ज्येष्ठ नेत्यांनी आदरांजली वाहिली.

आजचा दिवस ‘बाल दिन’ म्हणून साजरा केला जातो, त्या निमित्त आज देशभर विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

साहित्य अकादमी-बाल साहित्य पुरस्कार आज नवी दिल्ली इथं प्रदान केले जातील. हिंदी साहित्यात, हा पुरस्कार सुशील शुक्ल यांना 'एक बटे बारह' साठी प्रदान केला जाईल, तर मराठी भाषेसाठीचा पुरस्कार सुरेश सावंत यांच्या ‘आभाळमाया’ या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे.

<><><><><>

वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या राष्ट्रव्यापी अंमलबाजवणी अभियानात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती या अभियानासंदर्भातल्या अंतिम प्रगती अहवालात देण्यात आली आहे. या अभियानाच्या काळात महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ४० लाख लाभार्थ्यांपर्यंत विविध सरकारी योजनांचे लाभ पोहचवण्यात आले. या यादीत उत्तर प्रदेश प्रथम तर राजस्थान दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं १ जुलै ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत हे अभियान चालवण्यात आलं. अभियान काळात देशभरात प्रधानमंत्री जनधन योजनेत ६ लाखाहून अधिक खाती उघडण्यात आली, तर अटल निवृत्ती वेतन योजनेत सुमारे २ लाख नवे लाभार्थी जोडले गेले, अशी माहिती या अहवालात देण्यात आली आहे.

<><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ऑक्टोबर महिन्यात १ पूर्णांक २१ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला. सप्टेंबर महिन्याच्या तुलनेत त्यात १३ शतांश टक्क्यांची घट झाली. गेल्या महिन्यात अन्नपदार्थ, नैसर्गिक वायू, वीज, खनिज तेल आणि धातू उत्पादनाच्या किमतीत घट झाल्यामुळे महागाईचा दर वाढल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><>

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आजपासून ४४ वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा सुरू होत आहे. यंदाचा हा व्यापार मेळा, 'एक भारत श्रेष्ठ भारत' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि बिहार ही राज्यं या आंतरराष्ट्रीय मेळ्यात सहभागी झाली असून यामध्ये झारखंड हे राज्य केंद्रस्थानी असणार आहे. युएई, चीन, इराण, दक्षिण कोरिया आणि इजिप्तसह १२ देशांचा, या १४ दिवस चालणाऱ्या व्यापार मेळ्यात सहभाग आहे.

महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><>

राज्यातल्या केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीतल्या वेगवेगळ्या संस्थांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी वस्त्रोद्योग समितीच्या अध्यक्ष आणि वस्त्रोद्योग सचिव नीलम शमी राव काल आणि आज असे दोन दिवस मुंबईत आल्या आहेत. राज्याच्या वस्त्रोद्योग सचिवांची त्यांनी काल भेट घेतली. या वेळी त्यांनी केंद्राच्या योजना राबवताना राज्य आणि केंद्र यांच्यामध्ये सुसंगती साधण्यावर भर दिला तसंच राज्यात वस्त्रोद्योगावर परिणाम करणाऱ्या अनेक बाबींवर चर्चा केली.

<><><><>

मुंबई सीमा शुल्क विभागानं मुंबई विमानतळावर १२ कोटींपेक्षा जास्त किमतीचे अंमली पदार्थ, १ कोटींहून अधिक रुपयांचं सोनं आणि १३ लाखांहून अधिक रुपयांचं परकीय चलन जप्त केलं आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या वेगवेगळ्या प्रवाश्यांकडून १० ते १२ नोव्हेंबर दरम्यान सहा वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये हा माल जप्त करण्यात आला आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला पहिला क्रिकेट कसोटी सामना आज कोलकाता इथल्या इडन गार्डनमध्ये सुरु आहे.

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली.
शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या ६ गड्यांच्या बदल्यात १४६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

लेबनानची राजधानी बैरुत इथं भारतीय दूतावासानं आंतराष्ट्रीय गीता महोत्सव २०२५ आयोजित केला होता. भगवद् गीता, युनेस्कोच्या जागतिक स्मृती संग्रहात अंकित असून गीतेनं मानवाच्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन केलं आहे, असं या कार्यक्रमात भारताचे लेबनानमधले राजदूत नूर रहेमान शेख यांनी सांगितलं. यावेळी भारतीय वंशाच्या लोकांनी आणि लेबनानच्या नागरिकांनी गीतेतल्या श्लोकांचं पठण केलं तसंच गीतेबाबतचे आपले विचार मांडले. भारत आणि लेबेनान यांच्यातल्या मैत्रीपूर्ण संबंधांना ७१ वर्ष पूर्ण झाल्या निमित्त हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात २०० हुन अधिक जण सहभागी झाले होते.

//<><><><><>//